आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
२८ जुलै २०२५ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- पाकिस्ताननं आगळीक केली, तर ऑपरेशन सिंदूर पुन्हा सुरू होईल, असं संरक्षणमंत्र्यांचं लोकसभेत प्रतिपादन, तर त्यांच्या भाषणात अनेक प्रश्नांची उत्तरं मिळत नसल्याची विरोधकांची टीका

- गदारोळात राज्यसभेचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब

- महाराष्ट्र सरकार राज्यात ॲप आधारित रिक्षा, टॅक्सी आणि ई बाईक सेवा सुरू करणार

- आज मध्यरात्रीपासून बिनशर्त युद्धबंदी करण्यासाठी थायलंड आणि कंबोडिया यांच्यात सहमती

**आणि**

- नागपूरच्या दिव्या देशमुखची फिडे महिला बुद्धिबळ विश्वचषकाला गवसणी, मान्यवरांकडून अभिनंदनाचा वर्षाव

**<><><><>**

ऑपरेशन सिंदूर स्थगित केलेलं आहे, संपलेलं नाही. पाकिस्तानने भविष्यात कोणतीही आगळीक केली, तर ऑपरेशन सिंदूर पुन्हा सुरू होईल, असं संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी आज लोकसभेत सांगितलं. ऑपरेशन सिंदूरवरच्या चर्चेच्या प्रारंभी ते बोलत होते.

या कारवाईत भारताच्या सेनादलांनी पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधले ९ दहशतवादी तळ लक्ष्य केले. यापैकी ७ तळ पूर्णपणे उद्ध्वस्त झाले. यात १०० पेक्षा जास्त दहशतवादी ठार झाल्याचा अंदाज आहे, असं ते म्हणाले. ऑपरेशन सिंदूरचं उद्दिष्ट दहशतवाद्यांचे तळ उद्ध्वस्त करणं, दहशतवादाला खतपाणी घालणाऱ्या पाकिस्तानला धडा शिकवणं, आणि दहशतवादाबाबत भारताचं कठोर धोरण अधोरेखित करणं हे होतं, कोणत्याही युद्धाला तोंड फोडण्याचा यामागचा हेतू नव्हता, असं प्रतिपादन त्यांनी केलं. भारताच्या प्रत्युत्तरामुळे १० मे रोजी पाकिस्तानने हार मानली आणि शस्त्रसंधी करण्याचा प्रस्ताव ठेवला. ऑपरेशन सिंदूरसाठी ठरवलेली राजकीय आणि लष्करी उद्दिष्टं पूर्ण झाल्यामुळे ही कारवाई थांबवली. कुणाच्या दबावामुळे शस्त्रसंधी केल्याचे आरोप पूर्णपणे

चुकीचे आणि निराधार आहेत, असं ते म्हणाले. कोणत्याही कारवाईत अंतिम परिणाम महत्त्वाचा असतो. दहशतवाद आणि संवाद एकत्र चालू शकत नाहीत ही भारताची भूमिका आहे, असंही ते म्हणाले.

यानंतर विविध पक्षांच्या खासदारांनी या चर्चेत भाग घेतला. संरक्षणमंत्र्यांनी आपल्या भाषणात खूप माहिती दिली, मात्र पहलगाममध्ये दहशतवादी कसे घुसले, २६ पर्यटकांना त्यांनी गोळ्या घालून कसं मारलं, याची माहिती त्यांच्या बोलण्यात आली नाही, अशी टीका काँग्रेस खासदार गौरव गोगोई यांनी केली. तर, पहलगामध्ये पर्यटकांवर हल्ला करणारे दहशतवादी अद्याप पकडले न गेल्यावरून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार अरविंद सावंत यांनी सरकारवर टीका केली. आम्ही सशस्त्र दलांचं कौतुक करू, सरकारचं नाही, असं ते म्हणाले. पाकिस्ताननं शस्त्रसंधीसाठी विनवण्या केल्या असं सरकार म्हणतं, तर बिनशर्त युद्ध का थांबवलं, जगातल्या एकाही देशानं आपल्याला का साथ दिली नाही, असे प्रश्न त्यांनी विचारले. चर्चा अद्याप सुरू असून कामकाजाची वेळ रात्री १२ वाजेपर्यंत वाढवली आहे.

**<><><><>**

संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या आठवड्याच्या पहिल्या दिवशी विरोधी पक्षांनी विविध मुद्द्यांवर गदारोळ केल्यामुळे राज्यसभेचं कामकाज आज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं. कामकाजाला सुरुवात झाल्यानंतर विरोधकांच्या घोषणाबाजीमुळे आधी दुपारी बारा आणि नंतर दोन वाजेपर्यंत कामकाज तहकूब झालं. नंतरही गदारोळ चालूच राहिला आणि कामकाज दिवसभरासाठी स्थगित झालं.

**<><><><>**

महाराष्ट्रात राज्यात ॲप आधारित रिक्षा, टॅक्सी आणि ई बाईक सेवा राज्य सरकार सुरू करणार असल्याचं राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी आज सांगितलं. मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी मान्यता दिल्यानंतर हे ॲप कार्यान्वित केलं जाईल. यंत्रणेत पारदर्शकता ठेवण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व बाबींचा समावेश यात असून लवकरच ॲप तयार होणार आहे. यामुळे राज्यातल्या लाखो तरुणांना रोजगार उपलब्ध होईल, असं  सरनाईक म्हणाले.

या माध्यमातून मराठी तरुण- तरुणींना विशेष आर्थिक पाठबळ दिलं जाणार आहे. बेरोजगारांना रोजगार देण्यासाठी मुंबै बँक वाहन खरेदीसाठी १० टक्के व्याजदरानं कर्ज देईल, अशी ग्वाही मुंबै बँकेचे अध्यक्ष प्रवीण दरेकर यांनी दिली.

**<><><><>**

बिहारमधल्या मतदार याद्यांच्या सखोल पुनरीक्षण प्रक्रियेअंतर्गत येत्या १ ऑगस्टला मसुदा मतदार यादी प्रकाशित करण्यावर स्थगिती द्यायला सर्वोच्च न्यायालयानं नकार दिला आहे. एसआयआरला आव्हान देणाऱ्या याचिकेची सुनावणी आज सर्वोच्च न्यायालयात होती, मात्र आज सविस्तर सुनावणी झाली नाही. पुनरीक्षण प्रक्रियेत आधार आणि मतदार ओळखपत्र ग्राह्य धऱावं असं पीठाने निवडणूक आयोगाला सुचवलं.

**<><><><>**

भारताची दिव्या देशमुख हिनं फिडे महिला बुद्धिबळ विश्वचषकावर नाव कोरलं आहे. जॉर्जियाच्या बाटुमी इथं झालेल्या या स्पर्धेच्या अंतिम फेरीत तिनं भारताच्याच हंपी कोनेरू हिच्यावर अटीतटीच्या टायब्रेकमध्ये एका गुणानं मात केली. या यशाबरोबरच दिव्या ही भारताची ८८वी ग्रँडमास्टर ठरली आहे. कोनेरू हंपी, हरिका द्रोणावल्ली आणि वैशाली रमेशबाबू यांच्यानंतर ही कामगिरी करणारी ती चौथी महिला ग्रँडमास्टर आहे. मूळच्या नागपूरच्या असलेल्या दिव्याच्या या वाटचालीबद्दल ग्रँडमास्टर अभिजीत कुंटे म्हणाले,

- **- होल्ड… बाईट- अभिजीत कुंटे (२७ सेकंद) - -**

- **<><><><>**

दिव्याच्या या यशाबद्दल तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी जेतेपद पटकावल्याबद्दल दिव्या हिचं आणि उपविजेत्या हंपीचं समाजमाध्यमाद्वारे अभिनंदन केलं आहे. वयाच्या अवघ्या १९व्या वर्षी विश्वचषक मिळवणारी पहिली भारतीय महिला बुद्धिबळपटू ठरल्याबद्दल दिव्याचं, तर हंपी हिनं दीर्घ कारकीर्दीत सातत्यानं उत्तम कामगिरी केल्याबद्दल त्यांनी कौतुक केलं आहे. या स्पर्धेच्या अंतिम फेरीत दोन्ही बुद्धिबळपटू भारताच्या असणं हे भारतातल्या अपार प्रतिभेचं प्रतीक असल्याचंही राष्ट्रपतींनी नमूद केलं.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीही सोशल मीडिया पोस्टद्वारे दिव्याचं अभिनंदन केलं आहे. तिचं हे यश अनेक तरुणांसाठी प्रेरणादायी ठरेल, असं त्यांनी म्हटलं आहे. राज्यपाल

सी. पी. राधाकृष्णन यांनी, दिव्यानं हा खिताब जिंकून संपूर्ण देशाचा आणि विशेषतः महाराष्ट्राचा गौरव वाढवला, अशा शब्दात प्रशंसा केली आहे. दिव्यानं केवळ विजयच मिळवला नाही, तर भारतासाठी बुद्धिबळाच्या इतिहासातला एक सुवर्णक्षण लिहिला, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी तिचं कौतुक केलं. महाराष्ट्र सरकार दिव्याचा उचित सन्मान करेल असं फडनवीस यांनी आज नागपुरात वार्ताहरांना सांगितलं .

उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनीही दिव्या आणि हंपी यांचं कौतुक केलं आहे.

<><><><>

रोजगारात वाढ आणि विशेषतः कारखानदारी क्षेत्रात रोजगारक्षमता वाढवण्याच्या दृष्टीनं रोजगाराशी जोडलेली प्रोत्साहन योजना केंद्रसरकारने नुकतीच आणली आहे. या योजनेअंतर्गत युवकांना पहिल्या नोकरीत एक महिन्याचा पगार कमाल १५ हजार रुपयांपर्यंत दिला जाणार आहे. कारखानदार आणि उद्योजकांना रोजगारनिर्मितीसाठी प्रोत्साहन देण्यासाठी दोन वर्षं विशेष उपाययोजना केल्या जाणार आहेत. चालू आर्थिक वर्षात याकरता दोन लाख कोटी रुपयांची तरतूद केली आहे. दोन वर्षांच्या कालावधीत साडेतीन कोटी रोजगार निर्माण करण्याचं उद्दिष्ट आहे. या योजनेविषयी कर्मचारी भविष्य निर्वाह निधीच्या मुंबईच्या क्षेत्रीय कार्यालयात जनजागृतीपर कार्यक्रम राबवला जात आहे.

<><><><>

पश्चिम बंगाल सरकारनं अधिसूचित केलेल्या इतर मागासवर्गांच्या सुधारित यादीची अंमलबजावणी थांबवण्याच्या कोलकाता उच्च न्यायालयाच्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयानं आज स्थगिती दिली. इतर मागासवर्गांच्या अ आणि ब गटांमधल्या १४० उपश्रेणींच्या आरक्षणासंदर्भात पश्चिम बंगाल राज्य सरकारनं काढलेल्या अधिसूचनेला कोलकाता उच्च न्यायालयानं १७ जून रोजी स्थगिती दिली होती. राज्याला आरक्षणाबद्दलच्या २०१२ सालच्या कायद्यात सुधारणा करण्यासाठी विधिमंडळासमोर दुरुस्ती विधेयक आणावं लागेल या उच्च न्यायालयाच्या म्हणण्याशी सरन्यायाधीश भूषण गवई यांनी असहमती दर्शवली आहे. सरन्यायाधीशाच्या अध्यक्षतेखालच्या चार

न्यायाधीशांच्या पीठानं पश्चिम बंगाल सरकारच्या विशेष याचिकेवर हा निर्णय दिला असून येत्या दोन आठवड्यांत यावर सुनावणी घेतली जाईल असं म्हटलं आहे.

**<><><><>**

पाकिस्तानात कराची इथे सुरक्षा दलांशी झालेल्या चकमकीत तहरिके तालिबान चे ३ दहशतवादी ठार झाले आहेत. चिनी अभियंत्यांवर नोव्हेंबर २०२४ मध्ये झालेल्या हल्ल्यात सामील असलेल्या झाफरान या दहशतवाद्याचा त्यात समावेश आहे. ठार झालेल्या दहशतवाद्यांजवळून तीन हातबॉम्ब, कलाश्निकोव्ह रायफल, २ पिस्तुलं तसंच मोठ्या प्रमाणात दारुगोळा जप्त करण्यात आला आहे.

**<><><><>**

श्रीनगरच्या हरवान परिसरातल्या लिदवास इथं लष्करानं आज तीन दहशतवाद्यांचा खातमा केला. पहलगाममधे २२ एप्रिल रोजी दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात बैसरन गावात २६ नागरिकांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर दहशतवाद्यांचा शोध घेण्यासाठी ऑपेरेशन महादेव ही मोहीम लष्करानं सुरू केली. त्याचाच एक भाग म्हणून आजची कारवाई केल्याचं लष्करानं स्पष्ट केलं आहे. ही मोहीम अजून सुरु आहे.

**//<><><><>//**